Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# तिसरे रघुजी भोसलेंची धार्मिक सहिष्णूता व त्यांच्या दरबारातील मुस्लिम सेवक

**प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव**

इतिहास विभाग प्रमुख, आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे.

**सारांश :**

भोसले घराणे हे क्षत्रिय घराण्यांपैकी एक होय. महाराष्ट्रात भोसल्यांची अनेक घराणे वास्तव्यास होती. त्यापैकीच छत्रपती शिवाजी महाराजांचे कुळही भोसलेच होते. याच भोसले घराण्यातील शाखा म्हणजे नागपूरकर भोसल्यांची शाखा हिंगणी शाखा म्हणून इतिहासात ओळखली जाते.

नागपूरकर भोसल्यांचा मूळ पुरुष परसोजी भोसले होय. परसोजी भोसलेनंतर कान्होजी भोसलेस छ.शाहू महाराजांनी 'सेनासाहेबांची वस्त्रे' दिली. परंतु त्यांच्यात वितुष्ठ निर्माण झाले. म्हणून छ. शाहू महाराजांनी रघुजीस सनद दिली. पहिल्या रघुजीच्या काळात भोसल्यांचे सामर्थ्य वाढले व नागपूरला वैभव प्राप्त झाला. नागपूरचे भोसले हे सहिष्णूवृत्तीचे होते. भोसले कालखंडात हिंदू-मुस्लिम संबंध अत्यंत सलोख्याचे होते. सर्व भोसले राजे पिरांचे दर्शन घेवून आशिर्वाद घेत आणि पिरांना नवसही बोलत एवढेच नव्हे तर आपल्या राज्यात व दरबारात मुसलमानांना सन्मानाची वागणूक देत असत व आपल्या दरबारात त्यांना सन्मानाच्या जागाही देत असे तेच धोरण तिसरे रघुजी भोसले यांनी ठेवलेले दिसते. गोंड राजा बुराहतशहा यांच्यासी भोसले



राजे अतिशय प्रेमाने व आदराने वागीत, इद सणाच्या दिवशी भोसले राजे गौंडराजा व त्याच्या मुलांना वस्त्रे पाठवित. मोहरमच्या उत्सवात भोसले राजे स्वतः सहभाग घेत. तिसऱ्या रघुजी भोसल्यांनी मुसलमान बांधवांना वेगवेगळ्या पदावर नेमले होते. त्यात प्रामुख्याने मानकरी, स्वारांचा अधिकारी, न्यायाधिश, वैद्य, राजवैद्य, हकीम, मेजर, फारसी भाषेचे विद्वान पंडीत, पोलीस अधिकारी, गुप्त सल्लागार, कोतवाल, जहागिरदार, फौजदार, रिसालदार इत्यादी. अशा रितीने तिसरे रघुजी भोसले यांनी आपल्या राज्यात व दरबारात हिंदूप्रमाणे मुसलमान बांधवांना सन्मानाची वागणूक देवून प्रशासनात महत्त्वाची पदे बहाल केली आणि नागपूर राज्यात धार्मिक सहिष्णूतेची परंपरा कायम ठेवली.

**प्रस्तावना :**

भोसले घराणे हे क्षत्रिय घराण्यांपैकी एक होय. महाराष्ट्रात भोसल्यांची अनेक घराणे वास्तव्यास होती. त्यापैकीच छत्रपती शिवाजी महाराजांचे कुळही भोसलेच होते. याच भोसले घराण्यातील एक शाखा म्हणजे नागपूरकर भोसल्यांची शाखा होय. हिच भोसल्यांची हिंगणी शाखा म्हणून इतिहासात ओळखली जाते.[१] नागपूरकर भोसल्यांचा मुळ पुरुष परसोजी भोसले हे होय.[२] छत्रपती शाहू स्वराज्यात आल्यांनतर परसोजी यांनी महाराणी ताराबाई-शाहू संघर्षात छ. शाहूंना फार मोलाचे सहकार्य केले. म्हणून छ. शाहूंनी इ. स. १७०८ मध्ये त्यांना 'सेनासाहेब सुभा' हे पद बहाल करुन वऱ्हाड-गोंडवन प्रांताची सनद दिली.[२] इ.स. १७०९ मध्ये सेनासाहेब सुभा परसोजी भोसलेंचा मृत्यू झाला.[३] त्यानंत कान्होजी भोसलेस छत्रपती शाहूंनी सेनासाहेब सुभा ही पदवी बहाल केली.[४] परंतु कान्होजी भोसले व छत्रपती शाहू यांच्यात वितुष्ठ निर्माण झाले. म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी कान्होजी भोसले यांचा पुतण्या रघुजीस त्यांच्याविरुद्ध पाठविले. रघुजींनी कान्होजीस कैद करुन साताऱ्यास पाठविले आणि रघुजीस सनद बहाल केली.[५]

पहिल्या रघुजीच्या काळात भोसल्यांचे सामर्थ्य वाढले व नागपूरला वैभव प्राप्त करुन दिले. भोसलेंच्या मृत्यूनंतर जानोजी भोसले सेनासाहेब सुभा ४ थे पहिल्या रघुजी म्हणून नागपूरच्या सत्तेवर आले. त्यांनतर दुसरे रघुजी भोसले सेनासाहेब सुभा ५ वे म्हणुन सत्तेवर आले त्यानंतर परसोजी भोसले नंतर दुसरे मुधोजी उर्फ अप्पासाहेब भोसले यास नागपूरच्या गादीवर आले परंतु त्यास पदच्युत केल्यानंतर नागपूरचे राज्य खालसा करण्याचा विचार गव्हर्नर जनरल लार्ड हेस्टिंगजच्या मनात होता. परंतु सर्वत्र इंग्रजांच्या विरोधी वातावरण निर्माण झाले होते. म्हणून रेसिडेन्ट जेनकिन्स याने तिसऱ्या रघुजीस सत्तेवर बसविले.[६]

**उद्देश :**

१) तिसऱ्या रघुजी भोसलेबद्दल माहिती मिळविणे.

२) तिसऱ्या रघुजी भोसल्यांच्या धार्मिक सहिष्णूतेबद्दल माहिती मिळविणे.

३) तिसऱ्या रघुजींच्या काळात त्यांच्या राज्यात व दरबारात असलेल्या मुस्लिम सेवक व अधिकाऱ्याबद्दल माहिती मिळविणे.

**संशोधन पद्धती :** उपलब्ध असणाऱ्या साधनांच्या द्वारे माहिती मिळवून विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करुन हा शोधनिबंध तयार करण्यात आलेला आपणास दिसून येईल.

**विषय विवेचन : पूर्वचरित्र**

तिसऱ्या रघुजींचा जन्म इ.स. १८०७ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव बनूबाई वडीलांचे नाव व्यंकटराव गुजर होते. बनुबाई ह्या दुसरे रघुजी भोसले यांच्या कन्या होत्या. त्यांचा विवाह व्यंकटराव गुजर यांच्याशी झाले होते. तिसरे रघुजी हे दुसऱ्या रघुजींचे नातू होय. त्यांचे मुळ नाव बाजीबा असे होते. बाजीबा वयांच्या १० व्या वर्षी गादीवर बसला. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था रेसिडेन्ट जेनकिन्स यांनी केली होती.[७]

**राज्यारोहण समारंभ :**

रेसिडेन्ट जेनकिन्स यांने राणी बाकाबाईला व परसोजी भोसले यांची पत्नी दुर्गाबाई यांना बाजीबास दत्तक घेवून राज्यकारभार चालवावा असा सल्ला दिला व दत्तक घेण्याबाबतची संमती गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज कडून प्राप्त केल्यानंतर १८ जून १८१८ रोजी दुसऱ्या रघुजींची कन्या बनुबाई यांचा मुलगा बाजीबा उर्फ बाजीराव यास बाकाबाईच्या सल्ल्याने २५ जून १८१८ रोजी परसोजी भोसलेंची पत्नी दुर्गाबाईच्या मांडीवर दत्तक दिले व त्यांचे नाव तिसरा रघूजी असे ठेवण्यात आले.[८] आणि त्यास २६ जून १८१८ रोजी नागपूरच्या गादीवर बसविण्यात आले आणि ९ ऑक्टोबर १८१८ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर राज्यारोहण समारंभ करण्यात आला.[९]

भोसले कालखंडात हिंदू मुस्लिम संबंध अत्यंत सलोख्याचे होते. सर्व भोसले राजे पिरांचे दर्शन घेवून, आशिर्वाद घेत आणि पिरांना नवसही बोलत असत. रघुजी पहिल्याने भंडाऱ्यातील देवबा नावाच्या साधूचे व पीरशहा या मुसलमान साधूंचे दर्शन घेतले होते.[१०] त्याचप्रमाणे मुधोजींनी एलिचपूरच्या प्रसिद्ध मुसलमान संत रहमान गाझीच्या दर्ग्याच्या चारही बाजूंनी प्रवेशद्वार बांधले होते याची माहिती आपणास त्या दर्ग्यावरील शिलालेखातून मिळते.[११] अशाच प्रकारचे धोरण तिसरे रघुजी यांनीही आपल्या राज्यात राबवून मुसलमानांना आपल्या दरबारात सन्मानाची वागणूक दिलेली दिसते.

तिसरे रघुजी भोसले यांनीही मुसलमानांसी सलोख्याचे संबंध ठेवलेले होते. त्यांनी मुसलमानांच्या पिरांचा नेहमीच आशीर्वाद घेतला होता. पिराला नवस करुन तो फेडीत असत त्यांनी भंडारा येथील देवबा नावाच्या साधूचे व पिरशहा नावाच्या मुसलमान साधूचे दर्शन घेतले होते. नागपूर येथील गोंड राजांनी इस्लामधर्म स्विकारला होता, त्यांच्याशीही तिसरा रघुजी भोसले यांचे संबंध मैत्रीचे व सलोख्याचे होते, त्या राजांना तो आदराने वागवित असे. गोंड राजा बुरहानशहा यास अतिशय प्रेमाने व आदराने वागविण्याचे धोरण भोसल्यांचे होते. गोंड राजा भोसल्यांकडून तिन लाख रुपये पेन्शन घेई आणि नवीन वर्षाच्या आरंभी भोसले राजे किल्ल्यात जाऊन त्यास नजराणा देवून गौरव करीत असत. ईद सणाच्या दिवसी भोसले राजे गोंडराजा व त्याच्या मुलांना वस्त्रे पाठवित असत. मोहरमच्या उत्सवात भोसले राजे स्वतः हिरिरीने सहभागी होत असत. तिसरा रघुजी भोसले याने मिरअझीझ यास त्याच्या दरबारातील मानकरी म्हणून ठेवले होते आणि वर्षाला त्यास दोन हजार रुपये दिले होते.[१२] याशिवाय तिसऱ्या रघुजी भोसल्याने मिर्झा अझीझचा मुलगा खैरातअली यास ५० स्वारांचा अधिकारी म्हणून नेमले होते व त्यास दरमहा २०० रुपये पगार दिला होता. तिसऱ्या रघुजी भोसल्याच्या दरबारात एकूण ३५ मुसलमान लोक मानकरी होते. भोसल्यांच्या दरबारात जाफरहुसेन वल्द गुलाम हुसेन अरबांचा मुख्य होता. तिसऱ्या रघुजी भोसल्याने त्यास न्यायाधिशाच्या पदावर नेमले होते. त्यास रघुजी भोसलेने ५०० रुपये पेन्शनही चालू ठेवीली होती.[१३] मुसलमान व्यक्तींनमध्ये तिसऱ्या रघुजी भोसल्यांच्या दरबारात इनायतअलीखान, मौलवी अब्दुल कादर हकीम, सिंकदर अफजल हमीम हे वैदयाचा व्यवसाय करीत असत. फाजलखान हा तिसऱ्या रघुजीच्या कारकिर्दीत भोसले घराण्यांच्या लोकांचा खास वैदय होता. शिवाय फरहतउल्ला हाही तिसऱ्या रघुजीच्या काळात त्याच्या दरबारातला वैदय म्हणून होता. शिवाय हकीम सय्यद यादगार हाही त्याच्या दरबारातला हकीम होता. त्यापैकी सय्यद हुसेन हा प्रसिध्द हकीम होता. त्याला तिसरे रघुजी भोसले याने राजाश्रय दिला होता. शिवाय त्याचा व्यक्तीगत व कौटूंबिक वैदय म्हणूनही त्याची नेमणूक केली होती. यादगार हुसेन यास तिसऱ्या रघुजीने आठ हजार रुपये वार्षीक वेतनावर सैन्याचा मेजर म्हणून त्यास नेमले होते. हकीम इनायत अलीखान यास तिसऱ्या रघुजीने राहण्यासाठी जागा, सुंदर उदयान, दिवानखाना इत्यादी बांधून दिले होते. इनायतअली हा केवळ हकीमच होता असे नाही. तर तो फारसी भाषेचा विद्वानही होता. तत्वज्ञान, भौतीकशास्त्र व औषधीशास्त्र इत्यादी शास्त्राचा तो गाढा पंडीत होता. त्याने भिन्न रोगांवर करावयाच्या उपचार पध्दतीचे फारसी भाषेत एका पुस्तकात वर्णन केले आहे. हकीम मौलवी अब्दूल कादर हा दुसरा हकीम तिसऱ्या रघुजी भोसल्यांच्या दरबारातला

होता. त्यास अरबी व फारसी भाषा चांगली अवगत होती. त्याने आपल्या घराजवळच मस्जीद बांधली होती. तिसऱ्या रघुजी भोसलेने त्याच्या दरबारात, प्रशासन व्यवस्थेत राजवाडयात आणि सैन्यव्यव्थेत अनेक मुसलमानांची लायकी प्रमाणे नेमणूक केलेली होती. अनेक मुसलमान त्याच्या प्रशासनपध्दतीत मोठी पदे भूषवित होते. सल्लाउद्दीन याजकडे तिसऱ्या रघुजी भोसल्यांच्या काळात पोलीस विभागाची जबाबदारी टाकण्यात आली होती याने ती जबाबदारी एवढी व्यवस्थित पार पाडली होती की, त्यामुळे तिसऱ्या रघुजी भोसलेचा त्याने पूर्णविश्वास संपादीत केला होता. व त्यामुळेच राजाने त्यास गुप्त सल्लागार म्हणूनही नेमले होते. [१४] तिसरा रघुजी भोसले याने मुन्शी गुलामअली यास नागपूरचे कोतवालपद दिले होते. रघुजीचा गुलामअलीवर विश्वास होता. याशिवाय मोहम्मद सादुद्दीन व मोहम्मद सलाउद्दीन हे गुलाम अलीचे बंधू ही तिस-या रघुजी भोसलेंच्या कारकिर्दीत प्रसिध्द होते, त्यांना तिसऱ्या रघुजीने मनसबदार व जहागीरदार म्हणून दर्जा दिला होता. तसेच हाजी मोहम्मद झियाउद्दीन हा १८१८ च्या सुमारास नागपूरच्या दरबारात आला त्यास फौजदार म्हणून नेमण्यात आले होते. काजी नजीबुद्दीन हाही तिसऱ्या रघुजी भोसलेच्या कारकिर्दीत नागपूरास आला भोसल्याने त्यास रिसलदार पदावर नेमले होते. याशिवाय रघुजी भोसलेच्या दरबारात फत्तेउद्दीन, काझी गुलाम मोईनउद्दीन व महम्मद रहेतउद्दीन इत्यादी त्याच्या दरबारात सेवेत होते. फैज मोहम्मद हा १८२० या वर्षी नागपूर येथे आला व रघुजी भोसलेने त्यास प्रशासनात सामावून घेतले. तो कुशाग्र बुध्दीचा व उच्च विदयाभूषीत असलेला मुसलमान होता. रघुजीने त्यास फौजदार पद दिले. जमालउद्दीन हा १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात नागपूर येथे आला होता. त्यालाही रघुजी भोसल्यांनी प्रशासनात सेवेत रुजू करुन घेतले. जलालउद्दीन हा भोसल्यांच्या हिंगणा येथील सैन्य व्यवस्थेत रिसलदार म्हणून होता. तिसरा रघुजी भोसले याच्या दरबारात अनेक मुस्लीम अधिकारी प्रशासनीक व्यवस्थेत उच्च पदावर होते. त्यात मेहंदीहुसेन फैजउद्दीन खान, नवाजखान, गुलमोहम्मंदखान, मोहम्मद नासिरखान, सय्यद गुलाबनबी, घानोरी गुलाम कादर, मुफ्ती इमामउद्दीन, मुफ्ती सिरोजउद्दीन, महम्मदअली उद्दीन, हाजी गुलाम रसुल, गुलाम मुस्तफा, गुलाम मन्सुर, गुलाम अस्करी, गुलाम मसुद इत्यादी मुसलमान अधिकारी भोसल्यांच्या सेवेत होते. [१५]

तिसऱ्या रघुजीने धार्मिक सहिष्णूतेचे धोरण अवलंबीले होते. आपल्या दरबारातील विविध पदांवर मुसलमान व्यक्तींची नेमणूक करतांना हिंदू-मुसलमान असा भेद कधीही केला नव्हता. रघुजीने मुसलमान लोकांना जमीनही पेन्शन म्हणून दिली होती. त्यांच्या दरबारात हिंदू-मुसलमान हे बंधू भावाने व सलोख्याचे संबंध ठेवून होते, ते एक दुस-याच्या सण-उत्सवात मोठया आनंदाने सहभागी होत असत. तिसऱ्या रघुजी भोसल्यांच्या या सहिष्णूतेच्या धोरणामुळे अनेक मुसलमान लोकांनी हिंदूचे रितीरीवाज व चालीरिती आत्मसात केल्या होत्या. तसेच काही हिंदूंनी मुसलमानांच्या काही रितीरिवाज व चालीरितीचा अंगीकार केलेला होता.[१६] त्याच्या दरबारात मुसलमानांना नोकरी देण्यासाठी रघुजी भोसले तो मुसलमान म्हणून त्याला नाकारित नसे. त्यावरुन रघुजी भोसले यांचे धार्मिक सहिष्णूतेचे धोरण स्पष्ट होते.

तिसऱ्या रघूजी भोसले यांचा कार्यकाळ १८१८ ते १८५३ पर्यंतचा म्हणजे जवळजवळ ३६ वर्षाचा कालखंड होय. वयाच्या १९ व्या वर्षी त्यास नागपूरच्या रेसिडेन्ट जेनकिन्स याने गादीवर बसविले. त्याने या काळात उत्कृष्ठ प्रशासन करुन नागपूरात कला, शिल्पक्षेत्रात व स्थापत्य क्षेत्रात प्रगती करुन लोकोपयोगी कार्य केली. त्याचबरोबर आपल्या पूर्वजांप्रमाणे आपल्या राज्यातील मुसलमान बांधवानाही हिंदूप्रमाणे आपल्या दरबारात व राज्यात सन्मानाची वागणूक दिली. एवढेच नव्हेतर त्यांना आपल्या प्रशासनातील महत्त्वाची पदे मुसलमान बाधवांना बहाल केली आणि नागपूर राज्यात धार्मिक सहिष्णूतेची परंपरा कायम ठेवली.

## संदर्भ सूची :


१. कोलारकर श.गो., पुरंदरे गो.मा.- नागपूर राज्याचा अर्वाचीन इतिहास (इ.स. १६९९-१८६०), नागपूर, २००५ पृ. १
२. सरदेसाई गोविंद सखाराम- मराठी रियासत, खंड-३, मुंबई- २०१२, पृ. ५१.
३. कोलारकर,पुरंदरे- नागपूर राज्याचा अर्वाचीन इतिहास (इ.स. १६९९-१८६०), पृ. ८
४. उपरोक्त, पृ. ११
५. उपरोक्त मराठी रियासत, पृ. ५६१,५६२
६. अंधारे भा.रा.:अखेरचा सेना साहेब सुभा तिसरे रघुजी भोसले (१८१८-१८५३), नागपूर, २००३, पृ. १२
७. उपरोक्त , पृ. १२
८. उपरोक्त , पृ. १३
९. उपरोक्त
१०. उपरोक्त
११. Dr. M.Y.Quddusi- Bhonsalas of Nagpur and There Inscription of Ellichpur.
१२. अंधारे भा.रा. - अखेरचा सेनासाहेब सुभा तिसरे रघुजी भोसले, पेज नं.८३
१३. उपरोक्त, पेज नं.८३
१४. अंधारे भा.रा., पृष्ठ क्र.८५
१५. उपरोक्त, पेज नं.८७

१६. उपरोक्त, पेज नं.८८



**प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव**
**इतिहास विभाग प्रमुख, आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे.**